# महाराष्ट्र शासन

क्र.मअसे/५६-बी/सी/२०११/८३५

दूरध्वनी : २६६७०४३९
फॅक्स : २६६६०२८७

**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय,**
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रूझ-पूर्व, मुंबई - ४०० ०९८.

दिनांक : ५ सप्टेंबर,२०११.

प्रति,

**मा.आयुक्त, सर्व महानगरपालिका,**
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, विशेष नियोजन प्राधिकरणे,**
**मुख्याधिकारी, सर्व नगर परिषदा.**

विषय : दिनांक २६ जानेवारी,२०१२ व दिनांक १५ ऑगस्ट,२०१२ या अनुक्रमे प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्य दिनानिमित्त भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, अग्निशमन सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांना जाहिर होणा-या विविध अग्निशमन सेवा पदकांसाठी शिफारशी पाठविण्याबाबत.

संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्र.४९/अस/सीजी-२००७/सीआर-२, दि.०३.०२.२००६ व पत्र क्र.४४५/अस, दि.२९.०८.२००७

***महोदय,***

प्रतिवर्षी दिनांक २६ जानेवारी या प्रजासत्ताक दिनी व १५ ऑगस्ट या स्वातंत्रदिनी अग्निशमन सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांना भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालीलप्रमाणे विविध अग्निशमन सेवा तसेच अग्निशमन शौर्य पदके जाहिर करण्यांत येतात.

**अग्निशमन सेवा पदके (Fire Service Medals)**

(1) गुणवत्तापूर्ण सेवेसाठी अग्निशमन सेवा पदक (Fire Service Medal for Meritorious Service)

(२) उल्लेखनीय सेवेसाठी राष्ट्रपतींचे अग्निशमन सेवा पदक (President's Fire Service Medal for Distinguished Service)

**अग्निशमन सेवा शौर्य पदके (Fire Service Medals for Gallantry)**

(1) राष्ट्रपतींचे अग्निशमन सेवा शौर्य पदक (President's Fire Service Medal for Gallantry)

(2) अग्निशमन सेवा शौर्य पदक (Fire Service Medal for Gallantry)

०२. सदर पदकांसाठी लागणा-या आवश्यक त्या अटी, सुचना, शिफारशींचे नमुने, इ. माहिती या कार्यालयाच्या उपरोक्त संदर्भांकित पत्रासोबत पूर्वी पाठविलेली आहे. त्याचे कृपया काळजीपूर्वक अवलोकन व्हावे. दिनांक २६ जानेवारी,२०१२ या प्रजासत्ताक दिनी व १५ ऑगस्ट,२०१२ या स्वातंत्रदिनी मा.राष्ट्रपतींच्या वतीने जाहिर होणा-या **गुणवत्तापूर्ण सेवेसाठी अग्निशमन सेवा पदक (Fire Service Medal for Meritorious Service) व उल्लेखनीय सेवेसाठी राष्ट्रपतींचे अग्निशमन सेवा पदक (President's Fire Service Medal for Distinguished Service)** या अग्निशमन सेवा पदकांच्या शिफारशी खालीलप्रमाणे दिलेल्या अंतिम दिनांकापूर्वी या कार्यालयात १४ प्रतीत (पैकी किमान दोन प्रती शिफारसकर्त्यांच्या मुळ स्वाक्षरीतील असाव्यात) पोहचणे आवश्यक आहे. अंतिम दिनांकापूर्वी शिफारशी पाठविणे शक्य नसल्यास त्या पुढील प्रसंगी पाठविण्यांत याव्यात कारण ही सततची प्रक्रिया (on going process) आहे. शिफारशी पाठविण्याच्या तारखा त्यापुढील वर्षांसाठी सुध्दा खालीलप्रमाणेच राहतील.

| **पदके जाहिर होण्याची तारीख** | **केंद्राय गृह मंत्रालयास शिफारशी पोहचण्याची अंतिम तारीख** | **शिफारशी या संचालनालयास पाठविण्याची अंतिम तारीख** |
|---|---|---|
| २६ जानेवारी,२०१२ - प्रजासत्ताक दिन | २६ ऑक्टोबर,२०११ | **२० सप्टेंबर,२०११** |
| १५ ऑगस्ट,२०१२ - स्वातंत्र्य दिन | १५ मे,२०१२ | **३१ मार्च,२०१२** |

कृ.मा.प.